# निविदा सूचना

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथील खालील तपशीलातील वाहनाची " As is where is basis" वर विक्री करावयाची आहे.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदीचे वर्ष | वाहन क्रमांक | हातची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | (टाटा मांझा) | २०११ | एमएच ०२ एके-९४९५ | रू. १,१९,९६०/- |

सदरचे वाहन प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात उभे केले आहे. सदर वाहनाचा "जसे आहे तसे", या तत्वावर विक्री करण्यात येणार असून त्यासाठी सदर वाहन खरेदी करणेस इच्छुक व्यक्तींकडून मोहोरबंद देकार मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी सिलबंद लिफाफ्यात आपले देकार दिनांक ८ एप्रिल, २०२२ रोजी सायंकाळी ठिक ६.०० वाजेपर्यंत उप संचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांचे कार्यालयात समक्ष आणून द्यावेत. सदर वाहनाची तपासणी व इतर तपशिलांसाठी इच्छुक व्यक्तिंनी देकार प्रस्तुत करण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान खाली दिलेल्या संपर्क क्रमांकावर आस्थापना अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

सदर देकारांमध्ये इच्छुक खरेदीदारांनी सादर केलेल्या देकारांपैकी उपरोक्त तपशीलातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद करण्यात आलेल्या हातच्या किंमतीपेक्षा जास्त रकमेचे देकार ग्राह्य धरण्यात येतील. उशिरा आलेले देकार स्विकारले जाणार नाहीत. सदर सिलबंद लिफाफे दिनांक ११ एप्रिल, २०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता उप संचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांचे दालनात सकाळी ठिक ११.०० वाजता, जे खरेदीदार उपस्थित असतील त्यांचेसमोर, उघडले जातील. ज्या इच्छुकाने सर्वात जास्त किंमतीस सदरचे वाहन खरेदी करण्यास तयार असल्याबाबत देकारामध्ये नमुद केले असेल, त्याला सदरचे वाहन विक्री करण्यात येईल. सदर खरेदीदाराने विक्रीची किंमत चलनाने शासनाकडे भरणा केल्यानंतर सदरचे वाहन त्यांच्या ताब्यात देण्यात येईल.

ठिकाण : ८ वा मजला, प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई
दिनांक : ३१.०३.२०२२
संपर्क : ०२२-२६३८३०२५

(नि. म. प्रभूदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

\\१०.०.०.९०\\रामेश्वर\वाहन दुरुस्ती ak ९४९५.docx